
2016-2017



# समकालीन भारतीय राजकारण : महात्मा गांधी

संपादक

डॉ. रमेश रामराव बैनवाड (पाटील)

# समकालीन भारतीय राजकारण :
# महात्मा गांधी

ISBN No. 978-93-80899-08-4

संपादक :
डॉ.रमेश रामराव बैनवाड (पाटील)

प्रकाशन :
३० जानेवारी २०१७
©प्राचार्य, नूतन महाविद्यालय, सेलू. जि. परभणी.

प्रकाशक :
आदित्य पब्लिकेशन्स
७३, वरदानंद संकुल, अशोकनगर, नांदेड.

मुखपृष्ठ :
सतीश कुलकर्णी

मुद्रक :
मयूर प्रिंटर्स
पार्थ संकुल, कैलासनगर,
नांदेड - ४३१६०५.

मूल्य :
रु. ३००

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Parbhani

या पुस्तकात प्रकाशित झालेल्या लेखातील मतांशी संपादक, प्रकाशक सहमतच असतील असे नाही.

२५) महात्मा गांधीच्या ग्रामस्वराज्य विषयक विचारांची प्रासंगिकता : एक विश्लेषणात्मक अध्ययन/ममता मधुकरराव देशमुख
२६) गांधीजीच्या सामाजिक व राजकीय विचारधारेचे महत्व Importance of Gandhian Socio- Political Ideology/इंगोले अशोक मारोती
२७) भारतीय स्वातंत्र्य चळवळीत गांधीजीच्या धोरणांची भूमिका/प्रा.शेरे के.बि.
२८) गांधीजींचे सामाजिक तत्वज्ञान/गणेश मारोती कचरे
२९) महात्मा गांधी आणि अस्पृश्यता निवारण/खंदारे एन. व्ही.
३०) जनआंदोलनाची प्रभावी साधने - असहकार चळवळ व सविनय कायदेभंग/पल्लेवार के. डी.
३१) गांधींजीचे सामाजिक, धार्मिक, राजकीय विचारांचे महत्त्व/ पांडे भगवान सुखदेव
३२) महात्मा गांधींचे स्त्री उद्धाराचे कार्य /रासवे बालासाहेब मच्छिंद्र
३३) महात्मा गांधी आणि ग्रामीण भारत / प्रा. मोगल अनंत, प्रा.उगले सुरेश
३४) म. गांधीजींचे सामाजिक आणि राजकीय विचारांचे सद्यस्थितीत महत्त्व / सचिन प्रकाशराव देशमुख
३५) गांधींजींचा सर्वोदयी समाज /शारदा विजयकुमार सोळंके
३६) महात्मा गांधींजीचे पंचायतराज विषयक विचार/जाधव श्रीराम दामला
३७) महात्मा गांधी आणि ग्रामीण भारत/विठ्ठल सोनाजी शिंदे
३८) सत्य आणि अहिंसा गांधीवादाचे मुलाधार/विवेक सिध्दार्थ ढवळे
३९) गांधी आणि सत्याग्रह/पोले जयराम बालाजी
४०) महात्मा गांधी यांचे स्त्रीवादी विचार/डॉ.भागवत डी.आर., डॉ.संतोष कोल्हे
४१) गांधींजींच्या स्वप्नातील ग्रामीण भारत आणि सद्यस्थिती/ विश्वास दामोधर तळेकर
४२) महात्मा गांधीजींचे राजकीय व शैक्षणिक तत्वज्ञान/ वसीम अक्रम जाकेर बेग
४३) गांधीजींच्या संकल्पनेतील ग्रामस्वराज्य : एक दृष्टिक्षेप/मस्के समृध्दी जर्नाधन
४४) महात्मा गांधीच्या विचारांची प्रासंगिकता व महत्व/प्रा. भाऊसाहेब आवटे
४५) म.गांधीचे ग्रामीण विकासाबाबतचे विचार एक अभ्यास/प्रा.हूरगुळे एन.आर.
४६) ग्रामीण भारत आणि महात्मा गांधी/प्रा.डॉ.रामदास डी. मुक्टे
४७) पंचायत राज संस्था आणि महात्मा गांधीचे कार्य/प्रा. डॉ. रमाकांत तिडके
४८) गांधीजींचा राजकीय धर्म/डॉ. आर. वी. शेजुळ
४९) महात्मा गांधी यांच्या विचाराची २१ व्या शतकातील प्रासंगिकता- एक अभ्यास/प्रा. डॉ. सुखनंदन ढाले
५०) महात्मा गांधीच्या विचारांची प्रासंगिकता/प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव
५१) महात्मा गांधी आर्थिक विचार/प्रा.डॉ एम. डी. कच्छवे
५२) महात्मा गांधी व जातीय निवाडा/प्रा.डॉ.अंभूरे एस.डी.
५३) मं. गांधीचा राज्यविषयक दृष्टीकोण/प्रा.डॉ.आंधळे बी.व्ही.



PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Dist. Parbhani Pin-431516

# महात्मा गांधी व जातीय निवाडा

प्रा.डॉ.अंभूरे एस.डी.
इतिहास विभाग,
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ.

**प्रस्तावना:-**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत म.गांधीचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. भारतीय स्वातंत्र्यलढा हा त्यांचा व्यक्तिमत्व व कार्याभोवती केंद्रीत झाला. भारतीय स्वातंत्रलढ्यातील गांधीजी ही एकमेव व्यक्ती होते की, जिचे नाव संपूर्ण भारतात व जगातील सर्व देशातील जनतेपर्यंत पोहचले होते. म.गांधी प्रमाणेच आधुनिक भारतातच्या इतिहास घडविण्यात श्रेष्ठ विभुतीपैकी एक व्यक्ती म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर होय. त्यांचे कार्य, कर्तृत्व आणि विचाराचा परामर्श घेतल्या नंतर जवळपास ६५ वर्षे ७ महीने २१ दिवसे आयुष्य लाभले एवढया अल्पायुषामध्ये भारतीय समाज व्यवस्थेतील हजारो वर्षापासुन बहिष्कृत उपेक्षित ठेवलेल्या कोटयावधी लोकांसाठी सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक आणि शैक्षणिक आंदालने उभारले आणि स्वत:ची ओळख हरवुन असलेल्या आणि अधिकारहीन व्यक्तींना त्यांचे माणुसपण प्राप्त करुन दिले. भारतीय संविधानाची निर्मिती करुन भारतात व सर्व जगात ओळख निर्माण केली. अशा हया दोन्ही महापुरुषात वैचारिक मतभेद होते. या मतभेदाना काही तात्वीक कारणे आहेत का ? याचा उहापोह मी माझ्या लेखात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**म.गांधीचा व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा राजकीय उदय :-**

म.गांधी यांचे १९०४-१९०६ या काळात दक्षिण अफ्रिकेत वास्तव्य होते. गांधीजीनीच दक्षिण अफ्रिकेतील कृष्णवर्णीयांना आपल्या हक्काची जाणीव करुन दिली. गांधीजींनी हिंदी लोकांची बाजु घेऊन सत्याग्रह यशस्वी केला व म.गांधी ६ जाने १९१५ रोजी भारतात परत आले ते गोपाळ कृष्ण गोखले यांना आपले गुरु मानुन त्यांच्या सल्ल्या नुसार १९१५-१६ देशभर दौरे केले. भारतातील राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थितीचे अवलोकन केले. चंपारण, खेडा, अहमदाबाद सत्याग्रह पूर्ण करुन पुढे त्यांनी राबुन तीन आंदोलने केले. याच काळत

गांधीजी प्रमाणेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा साऊथ बरो कमिशनर समोर दिलेल्या साक्षीच्या निमित्याने भारतीय राजकारणात उदय झाला.

**साउथ बरो कमिशन( समोर दिलेली साक्ष):-**

भारतमंत्री असलेल्या मॉटिग्यु यांनी २० ऑगस्ट १९१७ रोजी घाषणी केली. भारताला राजकीय सुधरणांचा नवा हप्ता देऊन त्या नुसार ते इ.स. १९१८ भारतात आले व लॉर्ड साउथ बरो अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमले. या कमिशने भारतभर दौरे करुन वेगवेगळया जाती, जमाती, वेगवेगळे राजकीय पक्ष, संघटनेच्या मुलाखती घेतल्या त्या नुसार २७ जाने १९१९ मध्ये डॉ.बा.आ.यांनी आपली साक्ष दिली त्यानुसार एक व्यक्ति, एक मत, एकच मुल्य असले पाहिजे, अस्पृश्यांना आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचे निवारण करण्यासाठी स्वातंत्र्य मतदार संघ असावा, म्हणजे जातवार प्रतिनिधीत्व आणि अप्रश्यांना पुरेसे प्रतिनिधित्व अशा प्रकारे डॉ.बा.आ.बरोबर कमिशन समोर साक्ष दिली.

**सायमन कमिशन उद्देश :-**

डॉ.बा.आ.यांनी इ.स. १९२८ साली भारतात आलेल्या सायमन कमिशनला जी साक्ष दिली.कॉग्रेस व मुस्लीम लिगने सायमन कमिशनला विरोध केला. जागतीक पातळीवर डॉ.बा.आ.देशहिताला प्राधान्य दिले. देशांतर्गत दलीत व अस्पृश्य समाजाच्या हिताला प्राधान्य दिले.

**गोलमेज परिषद:-**

सायमन कमिशनला झालेला विरोध, ज्यामुळे भारतातील प्रचंड असंतोषाची लाट निर्माण झाली. भारताला राज्यघटना लागु करण्यापुर्वी भारतातील सर्व जाती, धर्म व पक्षांच्या प्रतिनिधींना चर्चासाठी लंडनला पाचारण केले. अस्पृशांच्या दोन प्रतिनिधी पैकी डॉ.बा.आ.परिषदेणे आमंत्रण दिले.

**डॉ.भीमराव आंबेडकर गोलमेज परिषदेत भुमिका :-**

दि.१२ नोव्हेंबर १९५० ब्रिटनच्या राजा जॉर्ज पाचवा यांनी गोलमेज परिषदेचे उद्घाटन केले. परिषदेत एकुण नउ समित्या होत्या. त्यातील अल्पसंख्यांक ह्या समितीकडे जतियतेच्या समावेशावर उपाय योजना शोधुन काढण्याचे काम होते. या समितीचे अध्यक्ष पंतप्रधान रेम्से मॅक्डोनॉन्ड होते. तेव्हा डॉ.बा.आ.यांनी अल्पसंख्यांक समिती समोर एक निवेदन तयार केले यात अस्पृश्यता निवारण, मुलभूत अधिकार,

मलभुत अधिकराची पायमल्ली करणाऱ्या व्यक्तिला योग्य ती शिक्षा, अशा प्रकारे डॉ.बा.आ.गोलमेज परिषदेत प्रभाविपणे आपली बाजु मांडली.

**डॉ.भीमराव आंबेडकर व म.गांधीवर :-**

गोलमेज परिषदेमध्ये फेडरल स्ट्रक्चर कमिटी ही एक समिती होती. डॉ.बा.आ.यांनी अस्पृश्यांना वेगळ्या मतदार संघाची मागणी करुन म.गांधी -डॉ.बाबासाहेब आंबेडकर सैध्दातिक वाद निर्माण झाला.गांधीच्या भुमिकेला डॉ.बा.आ.यांनी विरोध केला ऐवढेच नाही त्यांनी एका अयोग्य व्यक्तीला कॉंग्रेसने आपला प्रतिनिधी म्हणुन निवडायला नको होते. यावर गांधीजीनी सुध्दा असे म्हटले की, मी डॉ.बा.आ.यांची इज्जत करतो त्यांना प्रत्येक हिंदु अस्पृश्यचा शत्रु वाटतो. ते जे वेगळ्या स्वतंत्र्य निवडणुकीची मागणी ते करत आहेत. त्या मुळे कुठल्याही सामाजिक सुधारणा होणार नाहीत. परंतु डॉ.बा.आ.यांच्या भुमिकेमुळे हिंदु धर्माचे विभाजन होईल. ते मी कुठल्याही परिस्थिती होउ देणार नाही. जर अस्पृश्यांना इस्लाम किंवा ख्रिश्चन धर्म स्वीकारायचा असेल तर त्याला माझी हरकत नाही. परंतू मी एका गावचे दोन गाव होऊ देणार नाही.

**जातीय निवाडा व म.गांधी यांची भुमिका :-**

१९३०-१९३२ काळ्यात दोन गोलमेज परिषदा घेण्यात आल्या या परिषदेमध्ये डॉ.बा.आ.व म.बांधी यांनी परस्पर विरोधी भुमिका धरल्या शेवटी भारमंत्री सॅम्युअल होअर यांनी मि १७ ऑ.१९३२ रोजी जातिय निवाडा जाहिर केला. त्यानुसार अस्पृश्यांना प्रांतात व केंन्द्रात स्वतंत्र मतदार संघ, अस्पृश्यांसाठी दुहेरी मतदानाचा अधिकार दिला. ३) पंजाब सोडुन अन्य भागात अस्पृश्यांना राखीव जागा, ४) २० वर्षसाठी अस्पृश्यांना स्वतंत्र्य मतदार संघ स्थापन ५) मुस्लीम, शिख, युरोपियन, ख्रिश्चन यांना स्वतंत्र मतदार संघ, हा जातीय निवाडा जाहिर होताच म.गांधी यास विरोध केला. या ठिकाणी प्रश्न पडतो की, वरिल घटकांना स्वतंत्र मतदार संघ दिल्याने भारताची विभागणी होणार नाही का? दुसरा प्रश्न ग्रामीण भागात स्पृश्य व अस्पृश्य अगोदरच विभागणी झालेली नाही. म्हणजेच वर्णव्यवस्था चालु आहे. हा वर्णामध्ये मुले समाजात विभागणी होते हे महत्वाचे आहे.

**जातीय निवाड्याच्या विरोधात म.गांधीजीचे उपोषण:-**

म.गांधी यांनी ११ मार्च १९३२ रोजी भारत सचिव सर सॅम्युअल होअर

यांना आमरण उपोषणाचे पत्र दिले होते. परंतु १७ ऑ.१९९२ रोजी जातिय निवाडा घोषीत केला आणि २० सप्टेंबर १९३२ पासुन गांधीजीनी आमरण उपोषणास प्रारंभ केला. पुण्याच्या येरवडा तुरुगांत गांधीनी उपोषण केले. या ठिकाणी डॉ.बा.आ.यांनी स्पष्टपणे असे म्हटले होते की, भारतातील जातीयवादावर उपोषण केले असते तर अधिक योग्य झाले असते. परंतु दु:खाने म.गांधी केवळ दलितांना त्यांनी विरोध केला. कारण विशेष प्रतिनिधित्व केवळ दलितांना मिळाले नसुन ख्रिश्चन, ॲंग्लोनोईडियन, जमीनदार, मुसलमान, शिख इ. मिळाले होते. जर मुसलमान आणि शिखाचा स्वतंत्र मतदारसंघामुळे राष्ट्र खंडीत होण्याची भीती नसेल तर दलीताच्या स्वतंत्र मतदार संघामुळे हिंदु समाज कसा खंडीत होईल.

**पुणे करार :-**

डॉ.बा.आ.आणि म.गांधी दोघेही आपआपल्या भुमिकेवर ठाम होते. गांधीजीची प्रकृती गंभीर झाली होती. संपुर्ण देशात चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. डॉ.बा.आ.प्रश्न मांडला एकीकडे कॉंग्रेसचे नेते म.गांधी तर दुसरीकडे अस्पृश्य, दलीत वर्गाचा प्रश्न यातुन गांधीजी बरे वाईट झाले तर संपुर्ण भारतातील लोंकांना रोष द्यावा लागेल. शेवटी दविद्रनाथ टागोर, तेज बहादुर सप्रु, तडजोड करुन आणली. यातुन दि.२५ सप्टेंबर १९३२ रोजी डॉ.बा.आ.व म.गांधी यांनी पुणे करारावर स्वाक्षरी केल्या.

वरिल दोन्ही नेत्यांची बाजु बघितली तर देशाच्या समाजकारणात व राजकारणात पुर्णस्थान कोणी केले हा प्रश्न पडतो.

**संदर्भ :-**


१) भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास - डॉ.एस.एस.गा.गाठाळ

२) महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास - डॉ.अनिल शिनगारे, डॉ.विठ्ठल घुले

३) आधुनिक भारताचा इतिहास - र.म.लोहार

४) इतिहास उच्च मा.इ.बारावी - मदन मांर्डीकर


■■■




PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani